# महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

**'बालभारती', पु. ल. देशपांडे कला अकादमी, रवींद्र नाट्य मंदिराजवळ,**
**सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५.** फोन नं. (०२२) २४२१८००२ ते ०३

ईमेल आयडी – controller@ebalbharati.in / cpo@ebalbharati.in


## सूचना

**कामाचे नाव –** ११ महिन्यांकरीता (दि.०१.०५.२०२६ ते दि.३१.०३.२०२७ पर्यंत) स्टेशनरी खरेदीसाठी स्थानिक स्टेशनरी पुरवठादार संस्थांमार्फत दरपत्रके मागविण्यास मान्यता मिळण्याबाबत...

नियंत्रक कार्यालय, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई - २५ या कार्यालयाकडून स्टेशनरी साहित्य (सर्व करासहीत) खरेदी करण्याकरिता सोबत जोडलेल्या यादीनुसार खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी सदर यादीप्रमाणे आपले दर दि.१३.०४.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत नियंत्रक कार्यालय, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, 'बालभारती', पु.ल.देशपांडे कला अकादमी, रवींद्र नाट्य मंदिराजवळ, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - २५ या पत्त्यावर समक्ष प्राप्त होणे बंधनकारक आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रक मंजूर अथवा नाकारण्याचा अधिकार नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, मुंबई - २५ यांचा राहील.

## अटी व शर्ती

१) सदर स्टेशनरी/साहित्याचे दर पुढील ११ महिन्यांसाठी (दि.०१.०५.२०२६ ते दि.३१.०३.२०२७ पर्यंत) लागू राहतील.
२) स्टेशनरी/साहित्याची या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार दरमहा मागणी नोंदविण्यात येईल.
३) स्टेशनरी/साहित्याची मागणी केल्यानंतर त्याचा पुरवठा नियंत्रक कार्यालय/मंत्रालय तसेच मा. शिक्षणमंत्री महोदय व मा. शिक्षणराज्यमंत्री महोदय यांचे शासकीय निवासस्थान येथे त्वरित स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.
४) पुरवठा करण्यात येणारे स्टेशनरी/साहित्य हे उत्तम दर्जाचे तसेच मंडळाने ठरवून दिलेल्या ब्रॅन्डचेच असणे बंधनकारक आहे..
५) एकापेक्षा अधिक संस्थेचे साहित्यनिहाय दर न्यूनतम (एल-१) प्राप्त झाल्यास न्यूनतम दरांनुसार साहित्य पुरवठा विभागून देण्यात येईल.
६) दरपत्रकामध्ये पॅन नंबर व जी.एस.टी. क्रमांक नमूद केलेला असावा.
७) दरपत्रकासोबत अनु क्रमांक ६ मधील कागदपत्राच्या प्रमाणित छायाप्रती जोडणे अनिवार्य आहे.
८) पुरवठा केलेल्या स्टेशनरी/साहित्याचे देयक पुरवठा झाल्यानंतर जास्तीत जास्त १० दिवसात दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. देयक सादर केल्यानंतर देयकाची रक्कम धनादेश /एन.ई.एफ.टी दूवारे ३० दिवसापर्यंत अदा करण्यात येईल. देयकावर पॅन नंबर, जी.एस.टी. नोंदणी क्रमांक असणे अनिवार्य आहे.

कृ.मा.प.

९) सोबत जोडलेल्या यादीतील साहित्यांचा नमुना, दर्जा अथवा इतर माहिती आवश्यक असल्यास दि.०६.०४.२०२६ ते दि.१०.०४.२०२६ या कालावधीमध्ये कार्यालयीन सुट्टी वगळून सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० पर्यंत श्री. गोविंद वायळ, कार्यालय अधीक्षक यांना समक्ष भेटावे अथवा ९७५७२६९७९८ या मोबाईल नंबरवर संपर्क करावा.

(हेमंत बाबर)
**प्र. नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**दरपत्रक सूचना क्रमांक :** न/आस्थापना/स्टेशनरी/ 15
**दिनांक :** 02 APR 2026